नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :- ७/९/२०१०

**-: परिपत्र :-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्रं. १ (के) अन्वये सोमवार दि. ६/९/२०१० रोजी दुपारी ३:५५ (तीन पंचावन्न) वाजता भरलेल्या माहे सप्टेंबर २०१० या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्रं. २०७**

संदर्भ :- १) मा.नारायण चव्हाण यांचे दि. ६/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७००, दि. ३/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉ.क्र. ८४ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण व विविध विकासाची कामे करणेसाठी र.रु.३० लाख रुपयांचे पुढील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. १६, पावसाळी लाईन टाकणे, (यादी क्र.एस ३३), पान क्र. १८९, अ.क्र. २५, वॉ. क्र. ८४ गुरुवार पेठ मासेआळी परिसर पावसाळी लाईन टाकणे | ३० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम -** | | |
| वॉ.क्र. ८४ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण व विविध विकासाची कामे करणे | --- | ३० लाख |

**विषय क्रं. २०८**

संदर्भ :- १) मा.शांतीलाल मिसाळ व मा.सुनिल गोगले यांचे दि. १०/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७०३, दि. ३/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे महानगरपालिकेतर्फे आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद यांच्या जयंती महोत्सवासाठी झालेला खर्च अदा करणेकामी र.रुपये २६.२४ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-११ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र.१२८, अ.क्र. १०, शहरात विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्रं. एस ३), | | |
| १) पान क्रं.२०८, अ.क्र.१६६, वॉर्ड क्र.८६, येथील धोकादायक पोल काढणे अंडरग्राऊंड वायरिंग करणे | २.२४ लाख | --- |
| २) पान क्र. २०९, अ.क्रं. १७५, वॉर्ड क्र. ८६, मनपा वसाहत क्रं.९, येथे विद्युत वायरिंग बदलणे व प्रकाश व्यवस्था करणे. | २४ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| पुणे महानगरपालिकेतर्फे आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद यांच्या जयंती महोत्सवासाठी झालेला खर्च अदा करणे. | --- | २६.२४ लाख |

**विषय क्रं. २०९**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक–अ–मध्य उप–विभाग,दि. ३१/५/२०१०.
२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/करआकारणी व करसंकलन/२६६,दि.७/८/२०१०चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र. ७३५, दि. ३/९/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मधील कराधान नियम ४१ मधील नवीन सुधारणेनुसार कार्यवाही करणेबाबत कायद्यातील बदलानुसार प्रशासनामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

१) सन २०१०–२०११ या आर्थिक वर्षामधील मिळकतकराची पहिल्या सहामाहीची रक्कम माहे दि. ३० सप्टेंबर २०१० पूर्वी न भरणाऱ्या मिळकतदारांवर दि. ०१ ऑक्टोबर २०१० पासून प्रतिमहा २% इतकी शास्ती आकारणेस व दुसऱ्या सहामाहीची रक्कम दि. ३१ डिसेंबर २०१० पूर्वी न भरल्यास दि. ०१/०१/२०११ पासून दुसऱ्या सहामाहीची रक्कम प्रतिमहा २% इतकी शास्ती आकारण्यात येत आहे.

२) प्रस्तुत कायद्यातील तरतुदींनुसार कार्यवाही सुरू करण्यात येत असल्याबाबत पुणे शहरातील मिळकतदारांना माहिती होण्याच्या दृष्टीकोनातून स्थानिक दैनिक सकाळ व महाराष्ट्र टाइम्स या वर्तमानपत्रात १ वेळ जाहीर प्रकटन प्रसिद्ध करण्यात येईल.

३) मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मधील कराधान नियम ४१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रथमच प्रतिमहा २% प्रमाणे शास्तीची आकारणी करणे आवश्यक असल्याने व शासनाच्या शिक्षणकर व रोजगारहमी करावर १०% इतकी शास्ती आकारावयाची असल्याने प्रतिवर्षी दि. १५ ऑक्टोबरनंतर काढण्यात येणाऱ्या नोटीशीमध्ये बदल केलेला असल्याने याबाबत मिळकतदारांना माहिती होण्याच्या दृष्टीकोनातून व सन २०१०–२०११ ची बिले पाठवितांना बिलामध्ये नियम ४१ प्रमाणे उल्लेख असल्याने ज्या मिळकतधारकांनी बिल मिळूनही अद्यापही मिळकतकर जमा केलेला नाही त्यांच्या बिलावरील पहिल्या सहामाईस दि. ०१ ऑक्टोबर २०१० पासून नोटीस/पत्र देण्यात येईल.

४) कराधान नियम ४२ मध्ये (१) नियम ४१ अन्वये या मजकूराने सुरू होणाऱ्या व पुरेसे कारण दाखविले नाही या मजकूराने संपणाऱ्या मजकूराऐवजी ''ज्या व्यक्तिला बिल देण्यात आले आहे अशा व्यक्तिने या अधिनियमाच्या तरतुदीन्वये आवश्यक असल्याप्रमाणे शास्ती किंवा व्याज अथवा दोन्ही यांसह कर भरला नसेल तर ती व्यक्ति त्या कराची रक्कम भरण्यास पात्र असेल.'' (२) जी व्यक्ति तिला देण्यात आलेल्या बिलानुसार कर भरण्यास पात्र असेल व कर भरला असेल परंतु कराच्या न भरलेल्या रकमेवर देय असेल त्याप्रमाणे शास्तीची किंवा व्याजाची अथवा दोन्ही रकमा पूर्णपणे किंवा अंशत: भरल्या नाहीत तर अशा अदत्त राहिलेल्या रकमेबद्दल जणू काही अशी रक्कम कराबद्दल येणे असलेली रक्कम असे समजून त्याचरितीने अनुसूची ह च्या नमुन्यात अधिपत्र योग्य त्या फेरफारासह काढण्यात येईल.

**विषय क्रं. २१०**

संदर्भ :- १) मा.पोलिस आयुक्त यांचे पत्र क्र.अ.शा.प.क्र.अभिलेख १/व्हिडिओ कॅमेरा/२०१०, दि.३/७/२०१० चे पत्र.
२) मा.महापौर यांचे मा.महापालिका आयुक्त यांना जा.क्र.१९१६,दि.१७/७/१० चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठ.क्र.५७३,दि.१८/८/२००९.
४) मा.मुख्य सभा ठ.क्र.२८५,दि.२५/११/२००९.
५) मा.नगरसचिव यांचे क्र. २३१८ दि. १०/८/२०१० चे पत्र.
६) स्थायी समिती ठराव क्र. ७४०, दि. ३/९/२०१०.

---

मा. नगरसचिव यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पोलिस विभागास गणेशोत्सव,नवरात्र उत्सव,ईद,मोहरम तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शहरात विविध ठिकाणी व्हिडिओ कॅमेरे खरेदी करून कार्यरत करण्याकरता सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रकातील महापौर विकास निधीतून र.रु.पाच लाखाचा धनादेश मा.पोलिस आयुक्त पुणे १ यांच्या नावाने काढण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशांवर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**<u>विषय क्रं. २११</u>**

संदर्भ :– १) मा.उज्ज्वल केसकर व मा.निलेश निकम, सभागृह नेता यांचे दि. ३/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६१२ दि. ३/८/२०१०
३) मा.अति.महा.आयुक्त(वि)यांनी क्रं.मआ/उकाजा/२८७दि. १२/८/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. ७४१, दि. ३/९/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉर्ड क्र. १०६, पं.जितेंद्र अभिषेकी उद्यानात बारा बलुतेदारांची व पं.जितेंद्र अभिषेकी यांचा अर्धशिल्प करण्यासाठी र.रु. १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१०–२०११ चे अंदापत्रक, १६.उद्याने व प्राणीसंग्रहालये, पान क्र. १४०, अ.क्र. २९, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकासकामे करणे, (यादी क्र. एस–२७), पान क्र. २२८, अ.क्र. ६०, वॉर्ड क्र. १०७ पं.जितेंद्र अभिषेकी उद्यानामध्ये ऑडीओ व्हिज्युअल पर्यावरण पुरक हॉल बांधणे (एकूण तरतुद र.रुपये ५० लाख) | १५ लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>** | | |
| वॉर्ड क्र. १०६, पं.जितेंद्र अभिषेकी उद्यानात बारा बलुतेदारांची व पं.जितेंद्र अभिषेकी यांचे अर्धशिल्प करणे. | --- | १५ लाख |

**<u>विषय क्रं. २१२</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.मेधा कुलकर्णी यांचे दि. १२/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७४२, दि. ३/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ.क्रं.६६ येथील साकेत पेल ते हिमाली सोसा.पर्यंत आवश्यक तेथे नाल्यातील दुरुस्ती रिटेनिंग वॉल इ.विविध कामे करणेसाठी र.रु. ५० लाख रुपयांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१० –११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. १०, शहरातील निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी एस–२), पान क्र. १९४, अ.क्र. १९२, वॉ.क्रं. ६६ येथील अर्चनानगर जवळील नाल्याजवळील पुलाची रुंदी वाढविणे | ५०,००,०००/– | --- |

<u>नविन सुचविलेले काम</u>

| | | |
|---|---|---|
| वॉ.क्रं.६६ येथील साकेत पेल ते हिमाली सोसा.पर्यंत आवश्यक तेथे नाल्यातील दुरुस्ती रिटेनिंग वॉल इ.विविध कामे करणे | --- | ५०,००,०००/- |

**<u>विषय क्रं. २१३</u>**

संदर्भ :- १) मा.सुनिल टिंगरे यांचे दि. १३/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७४३, दि. ३/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. २ विद्यानगर-लोहगांव येथील स.नं. ३३/२ रोड नं. १४ येथील श्री.कैकाडी महाराज सार्वजनिक समाजमंदिराचा वरचा मजला बांधणेसाठी र.रु. ४.२५ लाख रुपयांचे पुढील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-११ चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने भांडवली निधीतून करावयाची कामे, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, पान क्र. सीपीटीएल १० २५/५६ कोड नं. सी.इ.२२ए ११४/ डब्ल्यू४-६५७, वॉर्ड क्र.२ येथे कै.गेणूभाऊ खेसे प्राथमिक विद्यालय इंदिरानगर लोहगांव रोड येथील सिमाभिंतीची उंची वाढविणे विविध कामे करणे | ४.२५ लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम -</u>** | --- | ४.२५ लाख |
| वॉर्ड क्र. २ विद्यानगर-लोहगांव येथील स.नं. ३३/२ रोड नं. १४ येथील श्री.कैकाडी महाराज सार्वजनिक समाजमंदिराचा वरचा मजला बांधणे | | |

**<u>विषय क्रं. २१४</u>**

संदर्भ :- १) मा.सौ.रोहिणी सांगडे व मा.दिपक बोडके यांचे दि. १६/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७४५, दि. ३/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. २९ मध्ये विविध ठिकाणचे विद्युत पोल शिफ्ट करुन भुमिगत केबल टाकणे व विद्युतविषयक सुधारणा करणेसाठी र.रु. ३० लाखांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-११ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र.१२८, अ.क्र. १०, शहरात विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्रं. एस ३), पान क्र. २०६, अ.क्र. ७६, वॉर्ड क्र. २९ सुतारवाडी प्रभागात विविध ठिकाणी विद्युत पोल बसविणे (एकूण तरतुद रुपये ५० लाख) | ३० लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम -</u>** | | |
| वॉर्ड क्र. २९ मध्ये विविध ठिकाणचे विद्युत पोल शिफ्ट करुन भुमिगत केबल टाकणे व विद्युतविषयक सुधारणा करणे | --- | ३० लाख |

**<u>विषय क्रं. २१५</u>**

संदर्भ :- १) मा.बापुराव कर्णेगुरुजी यांचे दि. १८/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७४६, दि. ३/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉ.क्र.१४ म.गांधीनगर येथे ४ व ६ इंची व्यासाची पाण्याची लाईन टाकणे करिता र.रु.१५ लाख रुपयांचे पुढील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २६, अ.क्र. ३, शुध्द पाण्याच्या मुख्य नलिका टाकणे, (अ) शहराचे मध्यवर्ती भागाच्या विकासासाठी, (यादी क्र.एस ५), पान क्र. ४०, अ.क्र.१७, वॉ. क्र.१४ शांतीरक्षक हौ.सोसायटी तील संपवेलचे पंपिंगसह काम पूर्ण करणे, (एकूण तरतूद र.रु.३० लाख) | १५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम –** | | |
| वॉ.क्र.१४ म.गांधीनगर येथे ४ व ६ इंची व्यासाची पाण्याची लाईन टाकणे | --- | १५ लाख |

**विषय क्रं. २१६**

संदर्भ :– १) मा.सौ.दिपाली प्रदिप धुमाळ व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. १८/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७४७, दि. ३/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॅार्ड क्र –१०९ स नं १२५ मधील सिटी लायब्ररीचे उर्वरीत काम करणेसाठी र.रुपये १० लाख व वॉर्ड क्र. १०९ हिंगणे होम कॉलनी मधील प्लॉट नं.३३ मध्ये समाजमंदिर व मैदानाचे उर्वरीत काम करणेकामी र.रुपये १० लाख असे एकूण र.रुपये २० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र. १४, भवन विभागांतर्गत विविध विकास कामे करणे, (यादी क्रं. एस २६), पान क्रं.२२०, अ.क्रं.९४, वॉर्ड क्र. १०९ स.नं.१२७(पार्ट) सांस्कृतिक भवन बांधणे. | २० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| १) वॅार्ड क्र –१०९ स नं १२५ मधील सिटी लायब्ररीचे उर्वरीत काम करणे. | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. १०९ हिंगणे होम कॉलनी मधील प्लॉट नं.३३ मध्ये समाजमंदिर व मैदानाचे उर्वरीतकाम करणे. | --- | १० लाख |

**विषय क्रं. २१७**

संदर्भ :– १) मा.सौ.मुक्ता टिळक व मा.सौ.मनिषा घाटे यांचे दि. १८/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७४८, दि. ३/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ. क्र. ८१ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रुपये ५ लाख व वॉ. क्र. ८१ मध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी र.रुपये ५ लाख असे एकूण र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र.१०, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणे, (यादी क्र.एस २), पान क्र. १९३, अ.क्र. १३७, वॉ. क्र. ५२ ओंकारेश्वर चौक मास्टिक असफाल्टींग करणे, (एकूण तरतूद र.रु.२० लाख) | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम –** | | |
| १) वॉ. क्र. ८१ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | ५ लाख |
| २) वॉ. क्र. ८१ मध्ये विविध विकासाची कामे करणे | --- | ५ लाख |

**<u>विषय क्रं. २१८</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि. २०/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७४९, दि. ३/९/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ९३ मध्ये हडपसर विठ्ठलनगर लक्ष्मी कॉलनी मध्ये शेवाळेवाडी जकात नाका याठिकाणी रस्ते ट्रिमिक्स पध्दतीने कॉक्रीट करून जकात नाक्याच्या मोकळया जागेत एन्ट्रिपास चलन करणेसाठी व भरणा करणेसाठी स्वतंत्र व्यवस्थापन करणेसाठी व उत्पन्न वाढविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरुन जकात नाका बांधणेसाठी र.रु.१.५० कोटीचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, १ मुख्य देखरेख वसुली वगैरे पा.क्र.११७,अ.क्र.७ जकात चुकवेगीरी रोखण्यासाठी व उत्पन्न वाढविणेसाठी विविध सुधारणा करणे व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जकात नाकी सुसज्ज करणे, ( एकुण तरतुद ३ कोटी ) | १.५० कोटी | ––– |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>** | | |
| वॉर्ड क्र. ९३ मध्ये हडपसर विठ्ठलनगर लक्ष्मी कॉलनी मध्ये शेवाळेवाडी जकात नाका याठिकाणी रस्ते ट्रिमिक्स पध्दतीने कॉक्रीट करून जकात नाक्याच्या मोकळया जागेत एन्ट्रिपास चलन करणेसाठी व भरणा करणेसाठी स्वतंत्र व्यवस्थापन करणेसाठी व उत्पन्न वाढविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरुन जकात नाका बांधणे | ––– | १.५० कोटी |

**<u>विषय क्रं. २१९</u>**

संदर्भ :– १) मा.ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. २०/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७५०, दि. ३/९/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

संत गाडगे महाराज यांचे जयंती निमित्त सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यासाठी र.रु.१५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, | | |
| पान क्र. १२२, अ.क्र.१०, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे व तद्‌नुषंगिक कामे करणे, (यादी क्र.एस २), | | |
| पान क्र.१९०, अ.क्र.३६, वॉर्ड क्र.१२ मध्ये महावीरनगर गल्ली नं.१ रस्ता डांबरीकरण करणे. | ५ लाख | ––– |
| पान क्र.१९०, अ.क्र.४१, वॉर्ड क्र.१२ कारगील विजयनगर याठिकाणी रस्ता डांबरीकरण करणे. | १० लाख | ––– |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>** | | |
| संत गाडगे महाराज यांचे जयंती निमित्त सांस्कृतिक महोत्सव साजरा करणे. | ––– | १५ लाख |

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**